# महाराष्ट्र विधानपरिषद

## पाचवे अधिवेशन, २०१६

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**गुरुवार, दिनांक १५ डिसेंबर, २०१६ / अग्रहायण २४, १९३८ ( शके )**

| | |
|---|---|
| **(१) महसूल, मदत व पुनर्वसन, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२) परिवहन, खारभूमी विकास मंत्री** | |
| **(३) कृषि आणि फलोत्पादन मंत्री** | |
| **(४) सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** | |
| **(५) पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यविकास मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ५२**

---

### पुणे शहरात शालेय विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या बसेस विना परवाना सुरु असल्याबाबत

**(१) * २५६६५ श्री.अनिल भोसले, श्री.जयवंतराव जाधव, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील शालेय विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या सुमारे १००० बसेस विनापरवाना सुरू असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी काय आढळून आले व तद्नुसार विनापरवाना शाळेच्या बसची वाहतूक करणाऱ्या चालकावर व त्यांना संरक्षण देणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे.

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) व (२) मा.मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर यांनी जनहित याचिका क्र.०२/२०१२ यात दिलेल्या निर्देशाच्या अनुषंगाने प्रादेशिक परिवहन अधिकारी, पुणे कार्यालयाच्या अभिलेखावर नोंद असलेल्या २८५८ शालेय विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या वाहनांपैकी दिनांक १५/०६/२०१६ पर्यंत एकूण १३३४ वाहनांची पुर्नतपासणी करण्यात आली. त्यानंतर पुर्नतपासणीसाठी मुदतवाढ मिळाल्यानंतर एकूण २५७८ वाहनांची पुर्नतपासणी करण्यात आली व शिल्लक २८० वाहनधारकांनी वाहने तपासणीसाठी सादर न केल्याने त्यांच्या वाहनांची नोंदणी निलंबित करण्याची कार्यवाही सुरू आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्य परिवहन महामंडळाच्या पालघर विभागाची आर्थिक स्थिती सुधारण्याबाबत**

**(२) * २३७५० श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यात राज्य परिवहन महामंडळाचे ९ डेपो असून या विभागीय परिवहन महामंडळाचे कार्यालय दरमहा रुपये २ कोटी याप्रमाणे वर्षाला रुपये २४ कोटी तोटयात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कार्यालयात विभागीय नियंत्रक, विभागीय वाहतुक अधिकारी व विभागीय वाहतुक अधिक्षक ही पदे रिक्त असून उक्त पदाचे काम प्रभारी अधिकारी पाहत असल्याचे दिनांक २ सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार राज्य परिवहन महामंडळाचे उत्पन्न वाढवून आर्थिक स्थिती सुधारण्याबाबत तसेच रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) राज्य परिवहन महामंडळाच्या पालघर विभागामध्ये आठ आगारे असून दरमहा अंदाजे रुपये २.८५ लाख एवढा तोटा होत असल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) अशंत: खरे आहे.

पालघर विभागातील विभागीय वाहतूक अधिकारी या पदावर पुर्ण वेळ अधिकारी नियुक्त केला आहे.

(३) रा.प. महामंडळाने उत्पन्न वाढवून तोटा कमी करण्यासाठी कृती आराखडा तयार करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**पंढरपूर (जि.सोलापूर) शहर व उपनगरातील रस्त्यांची झालेली दुरवस्था**

**(३) * २५५५५ श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.दत्तात्रय सावंत, श्री.श्रीकांत देशपांडे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपूर (जि.सोलापूर) शहर व उपनगरात तसेच मौजे शेळवे, खेडभाळवणी, कौठाळी या गावांतील रस्त्याची दुरवस्था झाल्यामुळे वाहनचालक व पादचाऱ्यांना त्रास सहन करावा लागत असल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पंढरपूर व माळशिरस (जि.सोलापूर) या दोन तालुक्याला जोडणारा श्रीपूर ते नेवरे या रस्त्याचे दिड वर्षापुर्वी लाखो रुपये खर्च करुनही रस्त्याची दुरवस्था झाली असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्‌नुसार सदर रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय, हे खरे आहे.

प्रश्नांकित रस्ते हे प्रजिमा १७० व प्रजिमा १३३ आहेत. या दोन्ही रस्त्यांवरून मोठ्या प्रमाणात वाळू व ऊस वाहून नेणाऱ्या जड वाहनांची वाहतूक असल्याने रस्ते मोठ्या प्रमाणात क्षतिग्रस्त झाले आहेत.

(२), (३) व (४) रस्त्यांच्या ३ कि.मी. लांबीतील डांबरी पृष्ठाभागावरील खड्डे डांबर मिश्रित खडीने भरण्यात आले आहेत. उर्वरित ६ कि.मी. लांबीतील रस्त्यांच्या क्षतिग्रस्त पृष्ठभाग खडी व मुरूमाने दुरूस्त करून रस्ता वाहतूकीसाठी सुरू ठेवण्यात आला आहे. रस्त्याच्या कायमस्वरूपी दुरूस्तीसाठी मजबूतीकरण व डांबरीकरणाची कामे काही लांबीत करणे आवश्यक आहे. ही कामे शासनाच्या विविध योजनांमधून मंजूरी निधी, निकष व प्राधान्यक्रमानुसार हाती घेण्याचे नियोजन आहे.

-----------------

**राज्यातील आठ कृषि सहसंचालक (जेडीए) कार्यालयाच्या नविन आकृतिबंधास मंजूरी देण्याबाबत**

**(४) * २४७०४ श्री.हरिसिंग राठोड, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **कृषि मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आठ कृषि सहसंचालक (जेडीए) कार्यालयाचे नविन आकृतिबंध तयार करण्यात आले असून हे आकृतिबंध निर्णयाविना पडून असल्याने खते, बियाणे, किटकनाशकांच्या गुणवत्ता नियंत्रणावर बऱ्याच मर्यादा आल्या असल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने निर्णय घेऊन सदर आकृतिबंधास मंजूरी देऊन त्याची अंमलबजावणी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्य परिवहन महामंडळात सेवानिृत्त कर्मचाऱ्यांना मोफत पास देण्याबाबत**

**(५) * २६३४० श्रीमती स्मिता वाघ :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य परिवहन महामंडळात आयुष्यभर सेवा करणाऱ्या कर्मचाऱ्यांना दोन महिन्याचा मोफत पास सवलत योजना बंद करण्यात आल्याचे माहितीच्या अधिकारातून माहे जुलै, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची मोफत पासची सवलत बंद करण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) व (२) राज्य परिवहन महामंडळातून सेवानिवृत्त झालेल्या कर्मचारी व अधिकारी यांना प्रत्येक वर्षातून जुलै ते फेब्रुवारी या कालावधीत दोन महिने मुदतीची मोफत पास सवलत योजना बंद करण्यात आलेली नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

**कणकवली-आचरा (जि.सिंधुदुर्ग) राज्य महामार्गाची झालेली दुरवस्था**

**(६) * २३९९२ श्री.नारायण राणे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कणकवली-आचरा (जि.सिंधुदुर्ग) या सुमारे ३२ कि.मी. अंतरावरील राज्य महामार्गाच्या दुरवस्थेमुळे प्रवाशांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत असल्याने सदर रस्त्याची दुरूस्ती करण्याबाबत स्थानिक ग्रामस्थांनी मागील २ वर्षापासून मा.पालकमंत्री सिंधुदुर्ग, मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, कणकवली, अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, रत्नागिरी यांच्याकडे लेखी मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू रस्त्यांच्या मजबूतीकरण, खडीकरण व डांबरीकरण करण्याचे काम हाती न घेण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून सदरहू रस्त्यांच्या दुरुस्तीचे काम पूर्ण होण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२) व (३) प्रश्नांकित रस्ता रा.मा. १८१ असून कणकवली-आचरा या दरम्यानची लांबी ३६.८०० कि.मी. आहे. या लांबीपैकी ७.८ कि.मी. लांबीच्या रस्त्याचा डांबरी पृष्ठभाग काही प्रमाणात क्षतिग्रस्त झाला आहे. रस्त्याच्या डांबरी पृष्ठभागावरील खड्डे जांभ्या दगड खडीने भरण्यात आले आहेत. रस्त्यावरील खड्डे डांबर मिश्रित खडीने भरण्याचे काम प्रगतीत आहे.

रस्त्याच्या क्षतिग्रस्त लांबीतील मजबुतीकरण व डांबरीकरण करण्याचे काम व अन्य आवश्यक कामे शासनाच्या विविध योजनांतर्गत मंजूरी, निधी, निकष व प्राधान्यक्रमाने हाती घेण्याचे नियोजन आहे. रस्त्यावरील वाहतूक सुरळीत सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे जिल्ह्यात दुध उत्पन्नात झालेली घट

**(७) * २४७५८ आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील सहकारी दूध व्यवसायात घट होत असल्याचे माहे जुलै, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सहकारी संस्थांच्या विशेष तपासणी मोहिमेंतर्गत २ हजार ४८१ पैकी १ हजार ३६५ प्राथमिक सहकारी दूध संस्था अवसायनात काढण्यात आल्या असून १५ बंद अवस्थेत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून खाजगी व्यवसायाचे वर्चस्व वाढू नये यासाठी सहकारी दूध व्यवसायाला दिलासा देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर :** (१) नाही.

पुणे जिल्हयातील सहकारी दूध व्यवसायात सन २०१५ मध्ये एप्रिल ते ऑगस्ट या कालावधीत एकूण २८.८३२ लि. एवढे दूध संकलन करण्यात आले आहे. तसेच सन २०१६ मध्ये एप्रिल ते ऑगस्ट या कालावधीत रु.२९.२५२ लाख लिटर्स एवढे दूध संकलन करण्यात आले असल्याने सन २०१६ या कालावधीत दूध संकलनात वाढ झालेली आहे.

(२) पुणे जिल्हयामध्ये दिनांक ३०/१०/२०१६ अखेर एकूण २४९२ प्राथमिक दुग्ध सहकारी संस्था पैकी ११०० संस्था कार्यरत असून १३६१ संस्था अवसायनात व ३१ संस्था बंद आहेत. त्यापैकी सर्व्हेक्षणाच्या विशेष मोहिमेंतर्गत अवसायनात निघालेल्या ३२२ संस्था आहेत. यापूर्वी अवसायनात निघालेल्या व या ३२२ अशा एकूण १६८३ संस्था अवसायनात आहेत.

(३) पुणे जिल्ह्यातील तालुका सहकारी दूध संघ व प्राथमिक सहकारी दूध संस्थांची शिखर संस्था म्हणजे पुणे जिल्हा सहकारी दूध संघ यांना त्यांचे उपविधीतील उद्देशाप्रमाणे जिल्ह्यातील सहकारी दुग्ध व्यवसाय टिकवण्यासाठी व त्यामध्ये वाढ होण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करावयाच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

पुणे जिल्ह्यातील तसेच राज्यातील दुग्ध उत्पादन वाढीस प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने राज्यातील प्रत्येक गावात अथवा लहान गावसमूहासाठी बल्क मिल्क कुलर उपलब्ध करुन देण्याकरिता दुग्धविकास खात्यामार्फत सर्वेक्षण मोहिम सुरु करण्यात येत आहे व नवीन बल्क मिल्क कूलर बसविण्याचे प्रस्ताव मागविण्यात येत आहे. तसेच ज्या गावात दूध संस्था नाहीत, तेथे त्या स्थापन करण्यासाठी किंवा अवसायनातील दूध संस्था पुनरुज्जीवित करण्यासाठी देखील कार्यवाही करण्यात येत आहे.

तसेच केंद्र शासनाकडून स्वच्छ दुध उत्पादन योजना N.D.P-१ N.D.P-२ पूरक प्रथिने निर्माण अभियान इ. योजनाचा लाभ सहकारी दुध संस्थाना देण्यात येत आहे. त्यामधून पुणे जिल्हा सहकारी दुध संघाला प्रोत्साहन देण्याची कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मंत्रीमंडळाच्या औरंगाबाद येथील बैठकीत घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याबाबत**

**(८) * २३४९२ श्री.अमरसिंह पंडित, श्री.नरेंद्र पाटील, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर** : सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाडा विभागाच्या विविध प्रलंबित प्रश्नांबाबत दिनांक ४ ऑक्टोबर, २०१६ रोजी औरंगाबाद येथे मंत्रीमंडळाची बैठक घेण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मंत्रीमंडळ बैठकीत रूपये ४९,२४८ कोटींच्या आराखड्यास मंजुरी दिल्याची घोषणा मा.मुख्यमंत्री यांनी केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या बैठकीत घेतलेल्या निर्णयाच्या अंमलबजावणीसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार** : (१) व (२) हे खरे आहे.

(३) व (४) मंत्रीमंडळ बैठकीतील निर्णय ज्या विभागांशी संबंधित आहेत त्या विभागांना निर्णयाची अंमलबजावणी करण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.

-----------------

**आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांसाठी राबविल्या जाणाऱ्या उपाययोजनांमध्ये नाशिक विभागाचा समावेश करण्याबाबत**

**(९) * २४३७२ श्री.जयवंतराव जाधव** : सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील २ हजार ३२२ शेतकऱ्यांपैकी नाशिक विभागातील ३७० शेतकऱ्यांनी माहे सप्टेंबर, २०१६ अखेर आत्महत्या केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांसाठी चौदा जिल्ह्यात राबविल्या जाणाऱ्या उपाययोजनांमध्ये नाशिक विभागाचा समावेश करून उपाययोजना राबविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी जिल्हास्तरांवरून चौकशी करून पात्र ठरलेल्या २०६ प्रकरणी रुपये १.०० लक्ष प्रती प्रकरण इतकी आर्थिक मदत अदा करण्यात आली आहे. तसचे शेतकरी आत्महत्या रोखण्यासंदर्भात विविध उपाययोजना करण्यासाठी कार्यरत असलेल्या कै.वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनच्या त्याचप्रमाणे बळीराजा चेतना अभियान या उपक्रमाच्या कार्यक्षेत्राची व्याप्ती वाढवून त्यामध्ये इतर जिल्हयांचा अंतर्भाव करण्याची बाब तपासण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**यवतमाळ जिल्हयातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याबाबत**

**(१०) * २५०८९ श्री.ख्वाजा बेग, श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्हयात माहे ऑगस्ट-सप्टेंबर, २०१६ मध्ये पाऊस न पडल्याने खरिपाची दोन लाख हेक्टरवरील पीके करपून गेल्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्‌नुसार पिकाचे सर्वेक्षण करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मौजे देवणी बु. (जि.लातूर) येथील गरजू बेघर विस्थपित महिला कुटुंबांना घरासाठी जागेचे प्लॉट देण्याबाबत**

**(११) * २५७२८ श्रीमती विद्या चव्हाण, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे देवणी बु. (जि.लातूर) येथील गावठाण विस्तारासाठी राखीव असलेली जमीन सर्व्हे नं. २२६/२३८/१ मधील २ हेक्टर जमीन ७५ गरजू बेघर विस्थापित महिला कुटुंबांना घरासाठी प्रथम प्राधान्याने देण्याबाबत समर्थन या संस्थेने मा.महसूल मंत्री यांना दिनांक १ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार पात्र ठरलेल्या ७५ गरजू बेघर विस्थापित महिला कुटुंबांना घरासाठी जागेचे प्लॉट वाटप करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.

(२) श्रमिक हक्क अभियान महाराष्ट्र संलग्न नॅशनल दलित मानवी हक्क अभियान या संघटनेच्या निवेदनाच्या अनुषंगाने तहसिलदार, देवणी यांनी स्थापित केलेल्या विशेष पथकामार्फत ७५ महिला कुटुंब प्रमुखांची तपासणी पूर्ण करण्यात आली आहे. त्यापैकी एकूण ४५ लाभार्थी पात्र ठरले असून त्यांना नियमानुसार भोगवटामूल्य वसुल करून भूखंडाचे वाटप करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**म्हाप्रळ (ता.दापोली, जि.रत्नागिरी) खाडीवरील पुलाची दुरूस्ती करण्याबाबत**

**(१२) * २४९६७ श्री.सुनिल तटकरे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) म्हाप्रळ (ता.दापोली, जि.रत्नागिरी) खाडीवरील पुल अवजड वाहनामुळे पुलाला तडे जावून पुल धोकादायक झाला असल्याचे निदर्शनास आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर पुलाचे स्ट्रक्चरल ऑडीट करून पुलाची दुरूस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) नाही.
(२) पूलाचे संरक्षक कठडे क्षतिग्रस्त झाल्याने त्याची दुरूस्ती करण्याचे काम प्रगतीत आहे. पूल सुस्थितीत आहे. पुलाचे स्ट्रक्चरल ऑडीट करण्यात येत असून या ऑडीटच्या अहवालातील निष्कर्षाप्रमाणे कार्यवाही करण्याचे नियोजन आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राष्ट्रीय कृषि पीक विमा योजनेंतर्गत जाहिर केलेली नुकसान भरपाई देण्याबाबत**

**(१३) * २५६३५ डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **कृषि मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राष्ट्रीय कृषि पीक विमा योजनेंतर्गत जाहिर केलेली नुकसान भरपाई तीन महिने होऊन गेल्यानंतरही ५०७६५६ शेतकऱ्यांना मिळाली नसल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार शेतकऱ्यांची प्रलंबित नुकसान भरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१) राष्ट्रीय कृषि विमा योजना खरीप २०१५ अंतर्गत ८२.५० लाख शेतकऱ्यांनी सहभाग घेऊन ४९.३३ लाख हे. क्षेत्र विमा संरक्षित केले होते. त्यापैकी ७१.५० लाख शेतकरी नुकसान भरपाईस पात्र ठरले आहेत व त्यांना रुपये ४२०५.०५ कोटी नुकसान भरपाई भारतीय कृषि विमा कंपनीमार्फत मंजुर करण्यात आली आहे. सदर नुकसान भरपाई रक्कम पात्र शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर जमा करण्यासाठी संबंधित बँकांना भारतीय कृषि विमा कंपनीमार्फत वितरीत करण्यात आली आहे. प्राप्त अहवालानुसार माहे नोव्हेंबर, २०१६ अखेर ६९.६५ लाख शेतकऱ्यांच्या खात्यावर संबंधीत बँकांमार्फत रुपये ४०२७.१७ कोटी नुकसान भरपाई वर्ग करण्यात आली आहे. उर्वरित रकमेसंबंधित उपयोगिता प्रमाणपत्रे बँकाकडून अद्यापपर्यंत भारतीय कृषि विमा कंपनीस प्राप्त झालेली

नाहीत. सदर उपयोगिता प्रमाणपत्रे संबंधित बँकाकडून प्राप्त करून घेणेबाबत भारतीय कृषि विमा कंपनीकडून कार्यवाही सुरू आहे.
(२) खरीप २०१५ हंगामासाठी मंजुर नुकसान भरपाई रक्कम संपूर्णपणे पात्र शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करणेबाबत भारतीय कृषि विमा कंपनीस सुचित करण्यात आले असून त्यानुसार कार्यवाही सुरू आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील मच्छिमारांना बोटींसाठी देण्यात येणाऱ्या**
**डिझेलच्या कोट्यामध्ये वाढ करण्याबाबत**

**(१४) * २६४७७ ॲड.राहुल नार्वेकर, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील मच्छिमारांना बोटींसाठी माहे फेब्रुवारी ते मार्च २०१५ मध्ये २० टक्के, माहे एप्रिल ते मे, २०१५ मध्ये २० टक्के, माहे ऑगस्ट ते ऑक्टोबर, २०१५ मध्ये ३० टक्के, माहे नोव्हेंबर ते जानेवारी, २०१५-१६ मध्ये ३० टक्के आणि माहे जून-जुलै, २०१६ वगळून एकुण रूपये ३५,७००/- इतक्या रक्कमेचा डिझेल कोटा पुरविण्यात येतो, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर डिझेल कोटा दोन महिन्याचाच पुरविण्यात येत असून तो कोटा वेळेत मिळत नसल्यामुळे मच्छिमारांचे आर्थिक नुकसान होत असून मच्छिमार बांधवांनी वार्षिक कोटा एकत्र देण्याची शासनाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून मच्छिमारांना वार्षिक डिझेल कोटा एकत्र देवून डिझेल कोट्यामध्ये वाढ करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर :** (१) होय.
(२) होय, हे अंशत: खरे आहे.
मच्छिमारांना वार्षिक कोटा एकत्र देण्याची मागणी केली असली तरी महिनावार ठरवून दिलेल्या कोटा टक्केवारीनुसार डिझेल कोटा वेळेत मंजूर करण्यात येत असल्याने मच्छिमारांचे नुकसान होत नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबईतील वांद्रे शासकीय वसाहतीचा पुनर्विकास करण्याबाबत**

**(१५) * २४८१८ श्री.अमरिशभाई पटेल, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील वांद्रे शासकीय वसाहतीचा पुनर्विकास करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन असल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार वांद्रे सहकारी वसाहतीत रहात असलेल्या शासकीय कर्मचाऱ्यांच्या राहण्याची पर्यायी व्यवस्था व वसाहतीचा पुनर्विकास करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय

(२) व (३) यासाठी स्कुल ऑफ प्लॅनिंग ॲण्ड आर्किटेक्चर, नवी दिल्ली यांना बांद्रा शासकीय वसाहतीच्या पुनर्विकासासाठी प्रकल्पाचा प्रकल्प पूर्व अभ्यास करून दोन महिन्यात आपला अहवाल सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

-----------------

**मराठवाडा व विदर्भात अतिवृष्टीमुळे नुकसानग्रस्त**
**शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याबाबत**

**(१६) * २४०९५ श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.संजय दत्त, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.अमरिशभाई पटेल, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाडयातील लातूर, बीड, नांदेड, परभणी, उस्मानाबाद व विदर्भातील जिल्हयामध्ये माहे सप्टेंबर व ऑक्टोबर, २०१६ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे जिवित व वित्त हानी झाल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मराठवाडा व विदर्भात झालेल्या अतिवृष्टीमुळे जिल्हयात झालेल्या नैसर्गिक आपत्तीचे शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून मराठवाडा व विदर्भात अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे मोठया प्रमाणात नुकसान झाल्याने ओला दुष्काळ जाहिर करुन नुकसानग्रस्तांना मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

(२) व (३) अतिवृष्टीमुळे शेतीपिकांची नुकसान भरपाई देण्यासाठी झालेल्या नुकसानीची आकडेवारी क्षेत्रीय कार्यालयांकडून अचूक पंचनामे करून मागविण्यात आली आहे. सदर माहिती संकलीत करण्याचे काम प्रगतीपथावर आहे. यासंदर्भात प्राप्त होणाऱ्या माहितीच्या अनुषंगाने नुकसानग्रस्तांना आर्थिक मदत देण्याबाबतचा निर्णय घेण्याची बाब प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

### धुळे जिल्हयातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याबाबत

**(१७) * २६४३७ श्री.चंद्रकांत रघुवंशी, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे जिल्हयात पाऊस न पडल्यामुळे पाण्याअभावी कृषि उत्पादन ४० ते ५० टक्क्यांनी घटणार असल्याचे कृषि विभागाच्या पाहणीतून माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बागायती कपाशीसह भाजीपाला व इतर पिकांवर रोगाचा प्रादुर्भाव वाढत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्‌नुसार दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.

(२) अंशत: खरे आहे.

(३) बाधीत शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**नाशिक जिल्ह्यात वातावरणातील बदलामुळे डाळींब पिके धोक्यात आल्याबाबत**

**(१८) * २३७०१ डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगाव, सटाण, कळवण व देवळा (जि.नाशिक) या तालुक्यात वातावरणातील सततच्या बदलामुळे डाळिंब पिकाला "तेल्या" रोगाचा प्रादुर्भाव होवून दहा हजार हेक्टर डाळिंब बाग शेतकऱ्यांचे नुकसान झाल्याचे तसेच दुष्काळी परिस्थितीमुळे चाळीस हजार हेक्टरवरील डाळिंब पिके धोक्यात आल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार तेल्या रोगावर प्रभावी उपाय अंमलात आणून या रोगाचा समुळ नायनाट करण्याबाबत तसेच रोगाचा प्रादुर्भाव रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मौजे लाडणापूर (ता.संग्रामपुर, जि.बुलढाणा) गावातील शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याबाबत**

**(१९) * २६४३५ श्री.सुभाष झांबड, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे लाडणापूर (ता.संग्रामपुर, जि.बुलढाणा) गावातील एका शेतकऱ्यांने सततची नापिकी व कर्जबाजारीपणाला कंटाळून दिनांक १५ ऑगस्ट, २०१६ रोजी आत्महत्या केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटूंबाला मा.मुख्यमंत्री यांनी दिनांक २१ मे, २०१५ रोजी भेट देऊन एक विहीर, ठिबंक संच, सोलर पंप, कृषि कर्ज देण्याचे जिल्हा प्रशासनाला निर्देश दिले, परंतू प्रशासनाने या निर्देशाची पूर्तता केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मा.मुख्यमंत्र्याच्या निर्देशांची पूर्तता करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

आनंद सोनाजी दुधमल यांनी दिनांक १५ ऑगस्ट, २०१४ रोजी आत्महत्या केलेली आहे.

(२) व (३) अंशत: खरे आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबई-नागपूर उन्नत महामार्गाच्या प्रकल्पामुळे**
**बाधित शेतकऱ्यांना मोबदला देण्याबाबत**

**(२०) * २४२९४ श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.सुनिल तटकरे, श्री.प्रकाश गजभिये, श्री.रामराव वडकुते, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-नागपूर उन्नत महामार्ग भिवंडी, शहापूर या तालुक्यातील २७ गावांतून जात असून सुमारे ३००० शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित केल्या जाणार असल्यामुळे शेतकऱ्यांनी मा.मुख्यमंत्री, मा.पालकमंत्री, ठाणे यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे विरोध केला असल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर प्रकल्पाकरीता ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित केल्या जाणार आहेत त्यांना मोबदला देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) होय.

(२) व (३) प्राप्त हरकती मुख्यत्वे शासनाच्या प्रस्तावित जमीन एकत्रिकरण नियमांबाबत आहेत. या रस्त्यासाठी आवश्यक जमीन ही जमीन एकत्रिकरण योजनेतून प्राप्त करून घेण्यात येणार असून ज्या लोकांची जमीन या प्रकल्पासाठी घेण्यात येईल त्यांना त्यांच्या जमिनीच्या मोबदल्यात विकसित बिनशेती भूखंड अनुज्ञेय व देय राहील व या भूखंडास दहा (१०) वर्षानंतर त्याचे योग्य बाजार मुल्य प्राप्त होत नसल्यास भूसंपादन अधिनियम २०१३ प्रमाणे देय होणारा मोबदला देऊन व्याजासह भूखंड शासनाकडून पुर्नखरेदीची तरतुद आहे.

तसेच त्यांच्या जमिनीच्या प्रतवारीनुसार पुढील १० वर्षासाठी वार्षिक अनुदानही देण्यात येईल. जमिनीच्या विकासावरील व त्यावरील बांधकामाचा मोबदला तसेच या बांधकामाची सामुग्री नेण्यास परवानगी राहील. भूखंड धारकांना कुटूंबातील एका पात्र व्यक्तीस किमान कौशल्य प्राप्त करुन देणारे व्यावसायिक प्रशिक्षण अनुज्ञेय राहील.

-----------------

**अजिंठा शहरास स्वतंत्र तालुक्याचा दर्जा देण्याबाबत**

**(२१) * २४५८७ श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जगप्रसिध्द पर्यटन स्थळांचे मध्यवर्ती केंद्र व ६० गावांचा समावेश असलेल्या अजिंठा या शहरास स्वतंत्र तालुक्याचा दर्जा देण्याची बाब सुमारे सात ते आठ वर्षापासून शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत निर्णय घेण्यात आला आहे काय, निर्णयाचे स्वरुप काय आहे,

(३) नसल्यास, अजिंठा या शंभर टक्के डोंगरी व दुर्गम व सह्याद्रीच्या डोंगर रांगेतील प्रमुख महामार्ग क्रमांक ८ वर असलेल्या युनेस्को मान्यता प्राप्त जागतिक वारसा स्थळासाठी नवीन तालुका निर्माण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२) व (३) तालुका विभाजनाच्या अनुषंगाने निकष निश्चित करण्याबाबत विभागीय आयुक्त, कोकण यांच्या अध्यक्षेतेखाली गठीत करण्यात आलेल्या समितीचा अहवाल शासनास प्राप्त झालेला आहे. प्राप्त अहवालातील शिफारशींच्या अनुषंगाने सर्व विभागीय आयुक्तांकडून मागविण्यात आलेले अभिप्राय प्राप्त झाले असून त्याचा विचार करून तालुका विभाजनाचे निकष निश्चित करण्याकामी धोरण अंतिम करण्याची कार्यवाही शासनस्तरावर सुरू आहे. सदर धोरण निश्चित झाल्यानंतर त्याआधारे प्रकरणपरत्वे नवीन तालुका निर्मितीबाबत उचित निर्णय घेण्याचे संकल्पित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मौजे पाम (ता.जि.पालघर) येथे सिरॉन ड्रग्ज कंपनीने वहिवाटीचा रस्ता बंद केल्याबाबत**

**(२२) * २६०६९ श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे पाम (ता.जि.पालघर) येथील सर्व्हे क्र.३०, ६४, ७५/३-ब व १६४ या जमिनीतून स्थानिक शेतकऱ्यांच्या वहिवाटीतील वडिलोपार्जित जागेत सर्वे क्र.३० मध्ये मे.सिरॉन ड्रग्ज ॲण्ड फार्मास्यूटिकल्स लिमिटेड या कंपनीने मोठा गेट बसविल्यामुळे शेतकऱ्यांचा येणे-जाण्याचा रस्ता ३-४ वर्षापासून बंद झालेला असून याबाबत जिल्हाधिकारी, पालघर, उपविभागीय अधिकारी व तहसिलदार, पालघर यांचेकडे दिनांक ३०/७/२०१४, दिनांक ११/८/२०१४ रोजी व माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदनाद्वारे तक्रारी केलेल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत मंडळ अधिकारी, तारापूर व तलाठी सजा कोलवडे यांनी दिनांक ४/२/२०१५ रोजी सायंकाळी ५.१० वाजता स्थळ पाहणी करुनही सदर रस्ता खुला केलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम १४३ अंतर्गत शेतकऱ्यांचा भातशेतीचा वहिवाटीतील असलेला रस्ता खुला करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२), (३) व (४) मौजे-पाम, ता.जि.पालघर येथील स.नं.३०, ६४, ७५/३-ब व १६४ या जमिनीतून स्थानिक शेतकऱ्यांच्या वहिवाटीतील वडिलोपार्जित जागेत जाण्या-येण्याच्या रस्त्यात स.नं.३० मध्ये मे.सिरॉन ड्रग्ज ॲण्ड फार्मास्यूटिकल्स लिमिटेड या कंपनीने मोठा गेट बसविल्यामुळे शेतकऱ्यांचा जाणे-येणेचा रस्ता बंद केल्याबाबत स्थानिक शेतकऱ्यांनी निवेदनाद्वारे तक्रारी दाखल केलेल्या आहेत.

सदर कंपनीचे पूर्वेकडील गेट व दक्षिणेकडील गेट खुले करण्यात आले असून सदर रस्ता आज रोजी मोकळा आहे. तसेच वृंदावन सोसायटीचे विकासक यांनी पत्रे लावून बंद केलेला रस्ता देखील खुला करण्यात आला आहे. सदर रस्त्याची कायमस्वरुपी उपाययोजना व्हावी या दृष्टीने तहसिलदार, पालघर यांनी स्थळपाहणी आयोजित केली असून महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ चे कलम १४३ नुसार कार्यवाही करण्याचे तहसिलदार यांचे स्तरावर संकल्पित आहे.

---------------------

**परभणी शहरातील वक्फ मालमत्तेवरील अतिक्रमणे हटविणेबाबत**

**(२३) * २४५०० श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी शहरातील वक्फ मालमत्ता असलेल्या सर्व्हे न.२ मधील जमिनीवरील अतिक्रमण हटविण्याबाबत उपजिल्हाधिकारी, तहसीलदार, अधिक्षक भूमी अभिलेख यांच्यास्तरावरून विलंब होत असल्याने माहे ऑक्टोबर, २०१६ अखेरही अतिक्रमणे कायम राहिली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार वक्फ मालमत्तेवरील अतिक्रमणे हटवून ७/१२ वरील नावे वगळण्याबाबत तसेच महसूल व वन विभागाच्या दिनांक १३ एप्रिल, २०१६ रोजीच्या शासन आदेशाचा भंग करणाऱ्यांवर संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) परभणी शहरातील सर्व्हे नं.२ मधील जमिनीबाबत दिवाणी न्यायालय, परभणी व मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ येथे विविध न्यायालयीन दावे/ याचिका दाखल असून प्रकरणे सद्यस्थितीत न्यायप्रविष्ठ आहेत. त्यामुळे उक्त जमिनीवरील अतिक्रमणाबाबत अद्याप नियमानुसार कार्यवाही होऊ शकली नाही. उक्त प्रकरणांत न्यायालयीन आदेश प्राप्त झाल्यावर पुढील कार्यवाही करण्याचे संकल्पित आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्हयातील आंबा व काजू बागायतदार शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत**

**(२४) * २३५५७ श्री.जयंत पाटील, श्री.नारायण राणे :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्हयातील आंबा व काजू बागायतदार शेतकऱ्यांचे सन २०१४-२०१५ या वर्षात वातावरणातील बदल, अवकाळी पावसामुळे नुकसान झालेल्या बागायतदार शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळालेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रत्नागिरी जिल्हयातील २० हजार ७१८.२० हेक्टर आंबा व ११ हजार ९६.६१ क्षेत्रावरील सुमारे ६४ हजार ८७४ शेतकऱ्यांचे नुकसान झाले असतांना शासनाने रत्नागिरी जिल्हयातील नुकसानग्रस्त आंबा व काजू पीक शेतकऱ्यांना नुकसानीपोटी रूपये ७९ कोटी ५३ लाख ७५ हजार मंजूर करुन ते अनुदान जिल्हा प्रशासनाकडे सुपूर्द केले असूनही अद्यापपर्यंत रूपये ३६ कोटी २४ लाख १५ हजार ५१५ एवढी रक्कम रत्नागिरी जिल्हयातील नुकसानग्रस्त लाभार्थ्यांना मिळणे प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू नुकसानग्रस्त बागायतदारांनी नुकसानींची रक्कम मिळावी म्हणून जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग तसेच जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांचेकडे माहे जुलै, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवदेनाद्वारे मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून नुकसानग्रस्त आंबा व काजू बागायतदारांना नुकसान भरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) रत्नागिरी जिल्हयाच्या मागणीप्रमाणे शासन निर्णय क्र.एससीवाय-०४/२०१६/ प्र.क्र.३४/म-११, दिनांक १४ ऑक्टोबर, २०१६ अन्वये रुपये ३६,२४,५१,०००/- इतका निधी वितरीत करण्यात आला असून, सदर निधी थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करण्याची कार्यवाही सुरु आहे. जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांची मागणी अद्याप अप्राप्त आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**रत्नागिरी-नागपूर महामार्गावरील सोलापूर ते मंगळवेढा या रस्त्यांची झालेली दुरवस्था**

**(२५) * २३९०६ श्री.प्रशांत परिचारक :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यामधून जाणारा रत्नागिरी-नागपूर राष्ट्रीय महामार्ग (क्र. १६६) या महामार्गावरील सोलापूर ते मंगळवेढा या रस्त्यांची दुरवस्था झाल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या महामार्गावर खड्डे पडल्याने व साईड पट्ट्या खचल्याने अपघात होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार सदर रस्त्याच्या दुरुस्ती व देखभाल करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) मंगळवेढा ते सोलापूर ह्या ५५.०० कि.मी. महामार्गापैकी १६.०० कि.मी. रस्ता सुस्थितीत असून ३९.०० कि.मी. उर्वरित महामार्गाच्या पृष्ठभागावरील खड्डे भरण्यात आले असून नुतनीकरणाचे काम निविदास्तरावर आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**संगमनगर (जि.सातारा) येथील कृष्णा नदीवरील पूलाची झालेली दुरवस्था**

**(२६) * २६०८२ श्री.आनंदराव पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संगमनगर (जि.सातारा) येथील कृष्णा नदीवरील ब्रिटीशकालीन पूलाच्या भिंतीमध्ये पिंपळाची झाडे ठिकठिकाणी वाढल्याने पूल धोकादायक झाला असल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार या पूलाचे स्ट्रक्चरल ऑडिट करुन त्याची दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) नाही, तथापि, झाडे झुडपे काढण्यात आली आहेत.
(२) व (३) पूलाची तपासणी करण्यात आली आहे. पूल सुस्थितीत आहे. पूलाचे स्ट्रक्चरल ऑडीट करण्याचे नियोजन असून अहवाल प्राप्त झाल्यावर निष्कर्षाप्रमाणे कार्यवाही करण्याचे नियोजन आहे. पूलावरून वाहतूक सुरळीत चालू आहे.

-----------------

**शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील धरणग्रस्तांचे पुनर्वसन करण्याबाबत**

**(२७) * २५७७८ प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शहापूर (जि.ठाणे) तालुक्यात पाटबंधारे विभागाच्या मुमरीचे धरणाच्या उभारणीकरिता जमीन संपादनाची प्रक्रिया पूर्ण झाली असून धरणबाधीतांचे पुनर्वसन व शासनाच्या सुविधांच्या लाभाची प्रक्रिया प्रलंबित असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या भूसंपादनात वनजमिनींवर वसलेल्या आदिवासी वाड्या वस्त्या स्थलांतरीत होणार आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या वाड्या व वस्त्यांच्या पुनर्वसन व शासन सुविधांच्या लाभाची प्रक्रिया राबवून लाभ देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.
(२) प्रकल्पामुळे ३४ कच्च्या घरांतील ५४ कुटुंबे बाधीत होणार आहेत.
(३) भुसंपादन प्रक्रिया अद्याप सुरु झालेली नाही. प्रकल्पासाठी आवश्यक क्षेत्र खासगी वाटाघाटीद्वारे उपलब्ध करुन घेण्याचे तसेच नियमोचीत पुनर्वसनाची प्रक्रिया राबविण्याचेही प्रस्तावित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राष्ट्रीय महामार्ग कार्यालयातील रिक्त पदे भरण्याबाबत**

**(२८) * २६१०२ श्रीमती हुस्नबानू खलिफे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय महामार्ग कार्यालयात निम्मी पदे रिक्त असल्याची बाब माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, झाराप ते कशेडी अंतर २७० कि.मी. पेक्षा जास्त आहे व राष्ट्रीय महामार्गावरील ब्रिटीशकालीन पूल तसेच मार्गाची लांबी पहाता त्यासाठी पूर्णवेळ आणि आवश्यक त्या संख्येने कर्मचाऱ्यांसह अधिकाऱ्यांची आवश्यकता असताना उप अभियंता, शाखा अभियंता या अत्यंत महत्वाच्या २६ पैकी १७ पदे रिक्त तर स्थापत्य अभियांत्रिकी-९, वरिष्ठ लिपिक-४, कनिष्ठ लिपिक-४, आरेखक-१, अनुरेखक संगणक ऑपरेटर प्रत्येकी-१, वाहनचालक-६, चतुर्थश्रेणी कर्मचारी चौकीदार-७ एवढी पदे रिक्त असून कार्यालयातील मंजूर ११६ पदांपैकी फक्त ६१ कार्यरत तर ५५ पदे रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२) व (३) मुख्य अभियंता, राष्ट्रीय महामार्ग कार्यालयात व त्या कार्यालयाच्या अधिपत्याखालील क्षेत्रिय कार्यालयांतर्गत एकूण १२०९ पदे मंजूर आहेत. त्यापैकी सद्य:स्थितीत ७९१ पदे कार्यरत असून ४१८ पदे रिक्त आहेत.

झाराप ते कशेडी ही राष्ट्रीय महामार्गाची लांबी कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्गाची लांबी कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग विभाग, रत्नागिरी यांचे अखत्यारित येते. कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग विभाग, रत्नागिरी या विभागात एकूण ११६ पदे मंजूर असून ६१ पदे भरलेली व ५५ पदे रिक्त आहेत.

सदर रिक्त पदे भरण्याबाबत शासनाच्या प्रचलित धोरणानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कोळंब (ता.मालवण, जि.सिंधुदूर्ग) पुलाची झालेली दुरवस्था**

**(२९) * २५८३३ श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोळंब पूल (ता.मालवण, जि.सिंधुदूर्ग) नादुरुस्त असून तो धोकादायक असल्याचा अहवाल सार्वजनिक बांधकाम विभागाने शासनाकडे सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सार्वजनिक बांधकाम विभागाने तीन वर्षापूर्वीच शासनाला दिलेल्या अहवालात या पुलाची सुरक्षा मुदत संपल्याचे सांगत पुलाला पर्यायी पुल उभारण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार या पुलाची दुरुस्ती न करता येथे नवीन पुल बांधण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) नाही.

(३) व (४) प्रश्नांकित पूलाची पाहणी करण्यात आली असून त्यानुसार सदर पूलाची दुरूस्ती करण्याचे काम मंजूरी व निधी उपलब्धततेच्या अधिन राहून हाती घेण्याचे नियोजन आहे.

----------------

**राज्यातील वाहनधारकांना आर.सी. बुक देण्याबाबत**

**(३०) * २५२६५ प्रा.अनिल सोले, श्री.मितेश भांगडिया, श्रीमती स्मिता वाघ :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ५० प्रादेशिक व उपप्रादेशिक परिवहन कार्यालयांतर्गत (आर.टी.ओ.) कार्यालयाने मागील दोन महिन्यापासून ५ लाख १३ हजार ५६१ वाहनधारकांना आर.सी. बुक दिले नसल्याचे दिनांक २५ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आर.टी.ओ. कार्यालयाकडून ग्राहकांना आर.सी. बुक न मिळण्याची कारणे कोणती आहेत,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार वाहनधारकांना आर.सी. बुक देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) होय.
(२) नोंदणी प्रमाणपत्र छपाईसाठी आवश्यक पूर्वमुद्रीत कागदाचा पुरवठा करण्याकरिता माहे मार्च, २०१६ मध्ये निविदा प्रसिध्द करण्यात आली होती. तथापि, निविदा प्रक्रियेस मा.दिवाणी न्यायालय, नागपूर येथे आव्हान दिले गेल्याने काही कालावधीकरिता पूर्वमुद्रीत संगणकीय स्टेशनरीची छपाई होऊ शकली नाही व निविदा प्रक्रिया स्थगित झाली. परिणामी कार्यालयास आवश्यक संख्येने पूर्वमुद्रीत स्टेशनरीचा पुरवठा होऊ शकला नाही व परिणामी वाहनधारकांना देण्यासाठी नोंदणी प्रमाणपत्र छपाई बाधित झाली.
(३) तात्पुरती व्यवस्था म्हणून प्रादेशिक विभाग स्तरावर नोंदणी प्रमाणपत्र छपाईची प्रलंबितता नष्ट करण्यासाठी सर्व परिवहन कार्यालयांना स्थानिक पातळीवर पूर्वमुद्रीत संगणकीय स्टेशनरी छपाईकरिता परिवहन आयुक्त कार्यालयामार्फत सूचना देण्यात आल्या.

राज्य स्तरावर पूर्वमुद्रीत संगणकीय स्टेशनरीचा पुरवठा करण्याकरीता सप्टेंबर, २०१६ मध्ये निविदा प्रसिध्द केली असून त्यानुसार नोव्हेंबर, २०१६ मध्ये पूर्वमुद्रीत स्टेशनरीचा सर्व परिवहन कार्यालयास पुरवठा करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**बीड, लातुर, परभणी, नांदेडसह मराठवाड्यातील शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याबाबत**

**(३१) * २५६०१ श्री.धनंजय मुंडे :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बीड, लातुर, परभणी, नांदेडसह मराठवाड्यातील सर्व भागात माहे सप्टेंबर, २०१६ मधील अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे खरीप पीकांचे नुकसान झाले असून ओला दुष्काळाची परिस्थिती निर्माण झाल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ओला दुष्काळ जाहिर करून शेतकऱ्यांच्या पीकांच्या नुकसानीचे पंचनामे करून शेतकऱ्यांना मदत देण्याची मागणी शेतकरी व लोकप्रतिनिधींकडून केली जात आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार ओला दुष्काळ जाहिर करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अंशत: खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) अतिवृष्टीमुळे शेतीपिकांची नुकसान भरपाई देण्यासाठी झालेल्या नुकसानीची आकडेवारी क्षेत्रिय कार्यालयांकडून अचूक पंचनामे करून मागविण्यात आली आहे. सदर माहिती संकलित करण्याचे काम प्रगतीपथावर आहे. यासंदर्भात प्राप्त होणाऱ्या माहितीच्या अनुषंगाने नुकसानग्रस्तांना आर्थिक मदत देण्याबाबतचा निर्णय घेण्याची बाब प्रगतीपथावर आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**बोईसर-तारापूर रस्त्याचे चौपदरीकरण करण्याबाबत**

**(३२) * २५६७५ श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बोईसर-तारापूर रस्त्याचे चौपदरीकरण करण्यासाठी न्युक्लिअर पॉवर कॉर्पोरेशनने निधी उपलब्ध करुनही सदर रस्त्याच्या कामाला मंजूरी मिळालेली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार बोईसर-तारापूर रस्त्यांचे चौपदरीकरण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

संबंधित यंत्रणेकडे सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत रुपये १७.८७ कोटी रक्कमेचा रस्त्याची सुधारणा, मजबुतीकरण व डांबरीकरण करण्याच्या कामांचा प्रस्ताव मंजूरी व निधी उपलब्धतेसाठी सप्टेंबर, २०१४ मध्ये सादर केला आहे. या प्रस्तावास अद्याप मंजूरी प्राप्त नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राजमाता विकास मच्छिमार सहकारी संस्था मर्या. ससून डॉक या संस्थेला मंजूर निधीमध्ये झालेला गैरव्यवहार**

**(३३) * २५७१० श्री.अनिल भोसले, श्री.जयवंतराव जाधव, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजमाता विकास मच्छिमार सहकारी संस्था मर्या. ससून डॉक या संस्थेला एन.सी.डी.सी. योजनेतून दिनांक ३० मार्च, २००९ रोजी वा त्यासुमारास बर्फ कारखाना आणि शितगृहे उभारण्यासाठी रूपये ३ कोटी ४२ लाख निधी मिळूनही या संस्थेने बर्फ कारखाना व शितगृहाची उभारणी केली नसल्याची बाब अखिल महाराष्ट्र मच्छिमार कृती समितीचे अध्यक्षांनी दिनांक १४ जुलै, २०१६ रोजी वा त्यासुमारास घेतलेल्या पत्रकार परिषदेमधून निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राजमाता विकास मच्छिमार सहकारी संस्थेला ३० मासेमारी यांत्रिक नौकांकरीता सन २००६-०७ या कालावधीत रूपये ११ कोटी ८४ लाखांचा निधी मंजूर करण्यात आला होता, परंतु मागील ९ वर्षात या संस्थेने एकाही नौकेचे निर्माण केले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार राजमाता विकास मच्छिमार सहकारी संस्था मर्या. ससून डॉक या संस्थेला नौका बांधणे व बर्फ कारखाना तसेच शितगृह उभारण्याकरिता निधी मंजूर करूनही कोणतीच कार्यवाही न करता निधीचा अपहार करणाऱ्या संबंधितांवर एसआयटी मार्फत चौकशी करून कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर :** (१) होय, हे अंशत: खरे आहे. बर्फ कारखानाचे बांधकाम पूर्णत्वाच्या टप्प्यात आहे व शीतगृहासाठी यंत्रसामुग्री जोडणीचे काम सुरु आहे.

(२) राजमाता विकास मच्छिमार सहकारी संस्थेच्या १५ मंजूर नौकांपैकी ५ पूर्ण व १० अपूर्ण स्थितीत आहेत. उर्वरित १० नौका सहा महिन्यात बांधकाम पूर्ण करण्यास अवधी दिला आहे.

(३) सदर संस्थेने पाच नौकांचे बांधकाम पूर्ण केले आहे. दहा नौका सहा महिन्यात पूर्ण करणार आहेत. बर्फ कारखाना व शीतगृह बांधकाम पूर्ण केले आहे व मशिनरी जोडणीचे काम चालू आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**एस.टी. महामंडळातील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची ग्रॅज्युएटी व रजा रोखीकरणाची प्रलंबित रक्कम अदा करण्याबाबत**

**(३४) * २३८७३ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एसटी महामंडळाच्या सुमारे अडीच हजार सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्तीनंतरची ग्रॅज्युएटी आणि रजा रोखीकरणाची रक्कम नियमानुसार एक महिन्याच्या आत सुपूर्द करणे बंधनकारक असतांना सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची ग्रॅज्युएटी व रजा रोखीकरणाची रक्कम रूपये १०० कोटींची थकीत राहिल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एस.टी. महामंडळाकडून समाजातील विविध घटकांसाठी सवलतीच्या दरात दिली जाणारी तिकीट सेवेतील सुमारे तीन हजार कोटी रुपयांची थकबाकी शासनाकडे प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले, आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची थकीत रक्कम देण्याबाबत तसेच समाजातील विविध घटकांसाठी सवलतींच्या दरात देण्यात येणाऱ्या तिकिट सेवेतील थकबाकी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) नाही.

(२) व (३) दिनांक ३१/०३/२०१६ अखेर शिल्लक सवलत मूल्य रूपये १३५४.८९ कोटी शासनाकडून महामंडळास येणे प्रलंबित होते. त्यापैकी रूपये ६२५.०३ कोटी सवलत मूल्यांची प्रतिपूर्ती महामंडळास दिनांक २१/०९/२०१६ च्या शासन निर्णयान्वये रोखीने अदा करण्यात आली आहे. त्यामुळे मागील थकबाकीपैकी रूपये ७२९.८६ कोटी प्रलंबित राहतात.

सन २०१६-१७ या आर्थिक वर्षातील सुधारीत अंदाजित सवलत मूल्य रूपये १३७९.८१ कोटी विचारात घेता सवलत मूल्यांपोटी शासनाकडून दिनांक ३१/०३/२०१७ अखेर सुमारे एकूण रूपये २१०९.६७ कोटी देणे प्रलंबित आहे.

शासनास महामंडळाकडून रूपये १०१२.०२ कोटी प्रवासी कर देय आहे. हा कर विचारात घेता महामंडळास शासनाकडून रुपये १०९७.६५ कोटी देणे प्रलंबित आहे. सदर रक्कम अदा करण्याबाबत शासन स्तरावर कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महागाव (जि.यवतमाळ) तालुक्यातील पशुवैद्यकीय दवाखाना बंद स्थितीत असल्याबाबत

**(३५) * २४७१४ श्री.हरिसिंग राठोड, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महागाव (जि.यवतमाळ) तालुक्यातील पशुवैद्यकीय दवाखाना बंद स्थितीत असल्यामुळे पशुपालन शेतकऱ्यांची जनावरे उपचाराअभावी दगावत असल्याने पशुपालन शेतकरी त्रस्त झाले असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांना दवाखान्यात उपस्थित राहण्याचे आदेश देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.महादेव जानकर :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मरोळ (ता.अंधेरी, जि.मुंबई) पोलीस वसाहतीतील इमारतींची झालेली दुरवस्था**

**(३६) * २४०७४ श्री.नारायण राणे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मरोळ (ता.अंधेरी, जि.मुंबई) येथील पोलीस वसाहतीतील संरक्षण भिंत ढासळत असल्यामुळे सदर इमारतींचे बांधकाम धोकादायक असल्याने इमारतींच्या दुरुस्ती व पुनर्बांधणी करण्यात यावी म्हणून दिनांक २८ सप्टेंबर, २०१५ व दिनांक ३ नोव्हेंबर, २०१५ रोजी विभागीय कार्यालयाने पोलीस आयुक्त तसेच अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग आदींकडे प्रस्तावाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार मरोळ येथील पोलीस वसाहतीतील इमारतींच्या दुरूस्ती व पुनर्बांधणीचे काम करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

दिनांक २८/०९/२०१५ व दिनांक ३/११/२०१५ रोजीच्या पत्रान्वये सा.बां. विभागाच्या क्षेत्रिय अधिकाऱ्यांनी अनुक्रमे कुंपणभिंतीची दुरुस्ती व इमारतीभोवती काँक्रिटीकरण करण्यासाठी करावयाच्या कामांसाठी एकूण रुपये ६९.१६ लक्ष रकमेची ढोबळ अंदाजपत्रके प्रशासकीय मान्यता व निधी उपलब्धतेसाठी गृह विभागाकडे सादर केली आहेत.

(२) व (३) प्रश्नांकित इमारत समूहातील इमारती ३० वर्षे पूर्वी बांधण्यात आल्या आहेत. इमारती खाऱ्या व दमट हवामानामुळे मोठ्या प्रमाणात क्षतिग्रस्त झाल्या असल्याने इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्यात आले आहे. या ऑडीटमधील निष्कर्षांप्रमाणे इमारतीच्या संरचात्मक दुरुस्त्या तातडीने करणे आवश्यक आहे. यासाठी करावयाच्या कामांचा रुपये ४८.५१ कोटी रकमेचा प्रस्ताव गृह विभागाकडे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये सादर करण्यात आला आहे. या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता व निधी उपलब्ध करुन देण्याची बाब मंजूरी, निधी, निकष व प्राधान्यक्रमानुसार गृह विभागांतर्गत शासनाच्या विचाराधीन आहे. मंजूरीनंतर काम हाती घेण्याचे नियोजन आहे, त्यामुळे विलंबाचा प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मराठवाडा विभागातील विविध मागण्यांबाबत**

**(३७) * २३४९३ श्री.अमरसिंह पंडित, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिनांक ४ ऑक्टोबर, २०१६ रोजी औरंगाबाद येथे मंत्रीमंडळ बैठकीत मा.मुख्यमंत्री महोदयांना मराठवाड्यातील लोकप्रतिनिधींनी मागण्यांबाबतचे निवेदन दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनातील मागण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, मराठवाड्यातील प्रलंबित प्रश्न व विकासाचा अनुशेष दूर करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे आहे.

(२) यासंदर्भात प्राप्त झालेल्या निवेदनामध्ये मराठवाडा विभागाशी संबंधित विविध मागण्यांचा अंतर्भाव आहे. सदर मागण्यांसंदर्भात संबंधित प्रशासकीय विभागांमार्फत कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) निर्देशांक व अनुशेष समितीने सन १९९४ मधील एकूण नऊ विकास क्षेत्रातील निश्चित केलेला अनुशेष दूर करण्यासाठी शासनाने उपलब्ध करुन दिलेला निधी परिणामत: मराठवाडा विकास मंडळातील केवळ सार्वजनिक आरोग्य या विकास क्षेत्रातील वित्तीय अनुशेष शिल्लक असून त्याकरीता विकास क्षेत्राच्या मागणीनुसार प्रतिवर्षी निधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**आर्णी-सावळी (ता.आर्णी, जि.यवतमाळ) येथील रस्त्याची झालेली दुरवस्था**

**(३८) * २५०९२ श्री.ख्वाजा बेग, श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आर्णी-सावळी (ता.आर्णी, जि.यवतमाळ) येथील रस्त्याची एक वर्षापूर्वी दुरुस्ती करुनही सदर रस्त्याची दुरवस्था झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार सदर रस्त्यांची बोगस काम करणाऱ्या सर्व संबंधितांवर कारवाई करून रस्त्याची दुरूस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय, अंशत: खरे आहे.

(२) होय.

वाहतूक वर्दळीमध्ये झालेली दुप्पट वाढ, अतिवृष्टी व जड वाहनांची मोठ्या प्रमाणात वाहतूक असल्यामुळे एकूण २२.५० कि.मी. लांबीपैकी साधारणत: २.८ कि.मी. चा रस्ता क्षतिग्रस्त झाला आहे. सदर रस्ता दोष दायित्व कालावधीत असल्यामुळे रस्त्याच्या दुरुस्ती करण्याचा सूचना कंत्राटदारास देण्यात आलेल्या आहेत. डिसेंबर, २०१६ पर्यंत काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे. रस्त्यावरुन वाहतूक सुरळीत सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विदर्भातील शेतकऱ्यांच्या वाढत्या आत्महत्या रोखण्याबाबत**

**(३९) * २५७२६ श्रीमती विद्या चव्हाण, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भातील सहाही जिल्ह्यातील शेत लागवडी नंतरच्या खर्चासाठी राष्ट्रीयकृत बँकेचा वेळेवर कर्ज पुरवठा न होणे, किटकनाशकांच्या वाढलेल्या किंमती, अतिवृष्टी, बी.टी. कापून सहन न करणे, तण काढणे आणि कोळपणी यासाठी आलेल्या मजुरीत वाढ यामुळे शेतकऱ्यांनी माहे जुलै पेक्षा ऑगस्ट मध्ये ३२% इतक्या जास्त आत्महत्या झाल्याचे दिनांक ८ सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार शेतकरी आत्महत्या रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) हे खरे नाही. तथापि, शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी उस्मानाबाद व यवतमाळ जिल्ह्यांत बळीराजा चेतना अभियान पथदर्शी विशेष कार्यक्रम राबविण्यात येत आहे. सदर कार्यक्रमाची व्याप्ती वाढवून त्यांची अंमलबजावणी इतर जिल्ह्यांमध्ये करण्याची बाब तपासण्यात येत आहे. त्याचप्रमाणे औरंगाबाद व अमरावती विभागातील सर्व जिल्हे व नागपूर विभागातील वर्धा अशा एकूण १४ जिल्ह्यांसाठी दिनांक २४ ऑगस्ट, २०१५ च्या शासन निर्णयान्वये कै.वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनची पुनर्रचना करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील नवीन जिल्हे व तालुके निर्मितीबाबत

**(४०) * २३७०३ डॉ.अपूर्व हिरे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित : तारांकित प्रश्न क्रमांक १९५९५ ला दिनांक १९ जुलै, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील नवीन जिल्हे व तालुक्याच्या निर्मितीबाबतचे निकष निश्चित करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या अप्पर मुख्य सचिव/ महसूल यांच्या अध्यक्षतेखालील समितीस माहे जून-जुलै २०१६ पर्यंत मुदत वाढ देण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माहे जुलै, २०१६ अखेरीची मुदतवाढ संपुष्टात आल्याने समितीने आपला अहवाल शासनाकडे सादर केला आहे काय,

(३) असल्यास, नाशिकसह राज्यातील आठ महानगरांची लोकसंख्या १५ लाखापेक्षा अधिक असल्याने या आठ ठिकाणी तहसिल कार्यालयाचे विभाजन करण्याचा तसेच मालेगांव (जि.नाशिक) हे अल्पसंख्यांक शहर असल्याने विशेष बाब म्हणून मालेगांव तहसिल कार्यालयाचेही विभाजन करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त अभिप्राय-शिफारशींचे स्वरुप काय आहे व तालुका विभाजनाचे निकष निश्चित करून नविन तालुका निर्मितीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२), (३) व (४) जिल्हा विभाजनाबाबत निकष निश्चित करण्याकरीता अप्पर मुख्य सचिव (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली आहे. सदर समितीचा अहवाल अंतिम करण्यात आला असून शासनाच्या मान्यतेसाठी सादर करण्याची कार्यवाही सुरू आहे. शासनस्तरावर मंत्रीमंडळाच्या मान्यतेने निश्चित केल्या जाणाऱ्या निकषानुसार नाशिक जिल्ह्याचे तसेच अन्य जिल्ह्यांचे विभाजन / पुनर्रचनेबाबत प्रकरणपरत्वे उचित निर्णय घेण्याचे योजिले आहे. तसेच तालुका विभाजनाच्या अनुषंगाने निकष निश्चित करण्याबाबत विभागीय आयुक्त, कोकण यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या समितीचा अहवाल शासनास प्राप्त झालेला आहे. प्राप्त अहवालातील शिफारशींच्या अनुषंगाने सर्व विभागीय आयुक्तांकडून मागविण्यात आलेले अभिप्राय प्राप्त झाले असून त्यांचा विचार करून तालुका विभाजनाचे निकष निश्चित करण्याकामी धोरण अंतिम करण्याची कार्यवाही शासनस्तरावर सुरू आहे. सदर धोरण निश्चित झाल्यानंतर प्रकरणपरत्वे नवीन तालुका निर्मितीबाबत उचित निर्णय घेण्याचे संकल्पित आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्याचा आपत्ती व्यवस्थापन विभाग युरोपच्या धर्तीवर अद्ययावत करण्याबाबत

**(४१) * २४५८९ श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्याचा आपत्ती व्यवस्थापन विभाग युरोपच्या धर्तीवर अद्ययावत करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, निर्णयाचे स्वरूप काय आहे,
(३) असल्यास, त्यानुसार आपत्ती व्यवस्थापन विभागाची रचना व कार्य प्रणाली कशी असणार आहे व त्याद्वारे मदतकार्य करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अशी बाब नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील समुद्रातील मत्स्य प्रजनन कालावधीत मासेमारीवर बंदी घालण्याबाबत**

**(४२) * २६१८२ श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम, १९८१ अन्वये प्रजनन काळात समुद्रातील मासेमारी बंदीचा कालावधी दिनांक १ मे, २०१६ ते १५ ऑगस्ट, २०१६ या कालावधीचा असावा याबाबत महाराष्ट्र मच्छिमार कृती समिती यांनी मा.मुख्यमंत्री, मा.मत्स्यविकास मंत्री, प्रधान सचिव, मत्स्यविकास विभाग, आयुक्त, मत्स्यविकास, मुंबई यांना दिनांक २५ एप्रिल, २०१६ रोजी व माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू कालावधीत पश्चिम किनारपट्टीतील कर्नाटक, गोवा, केरळ व गुजरात इत्यादी राज्यातील बोटी मासेमारी करीत असल्याने दिवसेंदिवस मत्स्य उत्पादन घटल्याने मच्छिमारांचा व्यवसाय बंद होण्याच्या मार्गावर आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून राज्यात मत्स्य पुनर्जीवन होऊन मत्स्य विकासात वाढ होण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर :** (१) होय.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पश्चिम उपनगरातील मालाड (प) येथील शासकीय भूखंडावर होत असलेले अतिक्रमण

**(४३) * २३५७३ श्री.जयंत पाटील, श्री.नारायण राणे :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पश्चिम उपनगरातील मालाड (प) येथील मालवणीतील सिटी सर्व्हे क्र.२२१, सीटीएस क्र.२९२० अलीतलाव येथील दौलत शाळेमागे गत ३० ते ४० वर्षापासून जिल्हाधिकारी अंतर्गत असलेल्या मोकळया शासकीय भूखंडावर भूमाफिया रमा तिवारी, विनोद तिवारी आणि त्यांचे इतर सहकारी यानी ३०० ते ४०० निवासी आणि अनिवासी घरे बांधली असून त्या जागेवर प्लांटिंग करून लाखो रूपयांना येथील जागा विकण्याचे सत्र सुरू असल्याबाबत माहिती तक्रारदार शीव पूजन सिंह यांनी उपनगर जिल्हाधिकारी, तहसिलदार, महापालिका, मालवणी पोलीस ठाणे आदीकडे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान तसेच गत १ वर्षापासून सातत्याने लेखी तक्रारी केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून सदर भागातील शासकीय जमिनीवर होत असलेली अतिक्रमणे हटवून भूमाफियांविरूध्द कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) पश्चिम उपनगरातील मालाड (प) मुंबई येथील सिटी सर्वे क्र. २२१, सीटीएस क्र. २६२० येथे झोपड्या बनवून विकत असल्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी तक्रारी केल्या हे खरे आहे.

(२) व (३) उपरोक्त तक्रार अर्जाच्या अनुषंगाने नगर भूमापन अधिकाऱ्यांची चौकशी केली असता उक्त जागेवर अतिक्रमण असल्याचे निदर्शनास आल्यामुळे दिनांक १९/११/२०१६ रोजी कच्चा व पक्क्या स्वरुपाच्या ११३ निवासी/अनिवासी झोपड्यांचे निष्कासन करण्यात आले आहे. सदर अतिक्रमणास कारणीभूत असलेल्या श्री.रमा तिवारी, श्री.विनोद तिवारी व त्यांचे इतर सहकारी यांचेविरुध्द मंडळ अधिकारी, गोरेगाव यांचेमार्फत भा.दं.वि. संहिता कलम ४४७ अन्वये एफआयआर क्र. ७५४/१६, दि. १/१२/२०१६ दाखल करण्यात आला आहे.

-----------------

## तारापूर, विटे, खरसोळीते आणि पोहोरगाव (ता.पंढरपूर, जि.सोलापूर) या गावांतील रस्त्यांची झालेली दुरवस्था

**(४४) * २३९०७ श्री.प्रशांत परिचारक :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तारापूर, विटे, खरसोळीते आणि पोहोरगाव (ता.पंढरपूर, जि.सोलापूर) या चार गावांना जोडणाऱ्या रस्त्याची दुरवस्था झाली असल्याने या गावांचा संपर्क तुटल्याचे दिनांक २ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भीमा नदीच्या पात्रातील वाळूच्या अवजड वाहतुकीमुळे तारापूर नाका ते पोहरगावपर्यंतचा रस्ता देखील खचल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार या गावांचा संपर्क तुटू नये याकरीता रस्त्याची दुरूस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) प्रश्नांकित गावांना जोडणारे ३ रस्ते प्रजिमा दर्जाचे आहेत. या रस्त्यांची एकूण लांबी १७ कि.मी. आहे. रस्त्यांवरून वाळू वाहून नेणाऱ्या जड वाहनांची वाहतूक मोठ्या प्रमाणात होत असल्याने रस्ते काही ठिकाणी क्षतिग्रस्त झाले आहेत. १.२० कि.मी लांबीतील मजबूतीकरण व डांबरीकरणाचे काम हाती घेण्यात आले आहे. उर्वरित लांबीतील आवश्यक सुधारणा, मजबुतीकरण, डांबरीकरणाची कामे मंजूरी, निधी, निकष व प्राधान्यक्रमानुसार हाती घेण्याचे नियोजन आहे. सद्यस्थितीत रस्त्यावरील खड्डे भरण्याचे काम प्रगतीत आहे. रस्त्यावरील वाहतूक सुरळीत ठेवण्यात येत आहे.

-----------------

**सातारा येथील जिल्हा मृद सर्वेक्षण व मृद चाचणी (माती परिक्षण) कार्यालयात केमिकल खरेदीत होत असलेला गैरव्यवहार**

**(४५) * २६०८५ श्री.आनंदराव पाटील :** सन्माननीय **कृषि मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा येथील जिल्हा मृद सर्वेक्षण व मृद चाचणी (माती परिक्षण) कार्यालयात माती परिक्षणासाठी आवश्यक केमिकलची संबंधित केमिकल कंपन्याच्या संगनमताने फक्त खरेदीची बिले जोडून रेकॉर्ड पूर्ण करण्याचे काम करण्यात येऊन लाखो रूपयांच्या निधीचा अपहार केल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१) व (२) जिल्हा मृद सर्वेक्षण मृद चाचणी प्रयोगशाळेमध्ये मृद नमुने तपासणीसाठी आवश्यक रसायनांच्या खरेदी प्रक्रियेबाबतची कागदपत्रे चोरीस गेल्याची बाब निदर्शनास आल्याने जिल्हा मृद सर्वेक्षण अधिकारी यांनी तालुका पोलीस स्टेशन, सातारा येथे दिनांक ०१/१२/२०१५ रोजी गुन्हा दाखल केला आहे.

सप्टेंबर, २०१६ मध्ये वृत्तपत्रामध्ये जिल्हा मृद सर्वेक्षण व मृद चाचणी प्रयोगशाळा सातारा येथे माती परिक्षणासाठी आवश्यक केमिकलची संबंधित केमिकल कंपन्यांच्या संगनमताने फक्त खरेदीची बिले जोडून रेकॉर्ड पूर्ण करण्याचे काम करण्यात येऊन लाखो रूपयांच्या निधीचा अपहार झाल्याचे वृत्त प्रसिध्द झाल्यानंतर जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांच्या सातारा कार्यालयातील तपासणी पथकाने दिनांक ०९/०९/२०१६ रोजी जिल्हा मृद सर्वेक्षण मृद चाचणी प्रयोगशाळा तपासणी केली. चोरीचा आरोप असलेल्या कर्मचाऱ्यांना दिनांक २३/०९/२०१६ रोजीच्या आदेशान्वये निलंबित करण्यात आलेले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**ठाणे जिल्ह्यातील वैतरणा नदीतील वाळू उपसा कायमस्वरूपी बंद करण्याबाबत**

**(४६) * २५९८५ श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.संजय दत्त, श्री.हरिसिंग राठोड, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील वैतरणा आणि सफाळे स्टेशनमधील वैतरणा नदीवरील ९२ व ९३ क्रमांकाचा पुल अवैध वाळू उपशामुळे धोकादायक अवस्थेत असल्याचा इशारा पश्चिम रेल्वेचे अभियंता यांनी महसूल विभागाच्या प्रमुख सचिवास पाठविलेल्या पत्राला दिला असून येथील वाळू उपशावर बंदी आणावी अशी मागणी रेल्वे प्रशासनाने शासनाकडे केली असल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर वाळू उपसा कायमस्वरुपी बंद करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) महाप्रबंधक, पश्चिम रेल्वे यांनी दिनांक १० ऑगस्ट, २०१६ रोजीच्या पत्रान्वये मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांच्याकडे पश्चिम रेल्वेच्या वैतरणा आणि सफाळे स्थानकांमधील वैतरणा नदीमधील ९२ व ९३ क्रमांकाचा पूल अवैध वाळू उपशामुळे धोकादायक अवस्थेमध्ये असल्याने तेथील वाळू उपशावर बंदी आणण्याबाबत विनंती केल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांचेकडे यासंदर्भात दिनांक २० ऑगस्ट, २०१६ रोजी प्रधान सचिव (महसूल), विभागीय आयुक्त, कोकण विभाग, जिल्हाधिकारी व पोलीस अधिक्षक, पालघर, चिफ ब्रीज इंजिनिअर (पश्चिम रेल्वे) यांची बैठक आयोजित करुन सदर बैठकीत उक्त रेल्वे पुलाजवळील रेतीचे अवैध उत्खनन थांबविण्याबाबत विविध उपाययोजना करण्याचा निर्णय घेण्यात आला असून जिल्हा प्रशासनाला व इतर संबंधितांना त्यानुसार कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ससून डॉक मत्स्योद्योग सहकारी सोसायटी मर्यादित, मुंबई या संस्थेच्या व्यवस्थापनाने केलेले गैरव्यवहार

**(४७) * २३४७६ श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.जयवंतराव जाधव, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ससून डॉक मत्स्योद्योग सहकारी सोसायटी मर्यादित, मुंबई या संस्थेच्या व्यवस्थापनाने केलेल्या गैरव्यवहाराबाबत उपनिबंधक सहकारी संस्था (मत्स्य) यांच्यामार्फत चौकशी सुरू असल्याचे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपनिबंधक सहकारी संस्था (मत्स्य) यांच्यामार्फत चौकशी पुर्ण झाली आहे काय, चौकशीनुसार संबंधित दोषी संस्था व अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर :** (१) होय, हे खरे आहे.

(२) यासंदर्भात निर्लेखन रकमेबाबत चाचणी लेखापरीक्षण करणेसाठी लेखापरीक्षकांना आदेश देण्यात आले आहेत.

संस्थेच्या व्यवस्थापनाने सन २००७ ते २०१२ पर्यंतच्या कालावधीत घेतलेल्या सभा सहकार कायद्यातील तरतुदीनुसार विसंगत असल्याने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ७५ (१) मधील तरतुदीनुसार प्राधिकृत अधिकाऱ्याची नेमणूक करण्यात आली आहे. तथापि, त्याविरूध्द संस्थेने आयुक्त (मत्स्य) यांच्याकडे अपील दाखल केले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मराठवाडा विभागातील शेतकऱ्यांचे सूक्ष्म सिंचन अनुदान प्रलंबित असल्याबाबत**

**(४८) * २३५९९ श्री.अमरसिंह पंडित, श्री.नरेंद्र पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक १९६३६ ला दिनांक २६ जुलै, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:**
सन्माननीय **कृषि मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मराठवाडा विभागात मागील चार वर्षापासून सतत दुष्काळ व टंचाई परिस्थिती असतानाही या भागातील शेतकऱ्यांचे सूक्ष्म सिंचन अनुदान प्रलंबित असल्याने केज (जि.बीड) तालुक्यातील शेतकऱ्यांनी दिनांक २० ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना निवेदन देऊन आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मराठवाडा विभागातील विशेषतः बीड जिल्ह्यातील किती शेतकऱ्यांचे कोणकोणते अनुदान वर्षनिहाय प्रलंबित आहे तसेच प्रलंबित अनुदान केव्हा मिळणार आहे,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून सूक्ष्म सिंचन शेतकऱ्यांचे प्रलंबित अनुदान देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१) होय.
(२) व (३) बीड जिल्ह्यातील सन २०१३-१४ व सन २०१४-१५ या वर्षातील सूक्ष्म सिंचनाचे पुर्व संमती दिलेल्या प्रस्तावांचे अनुदानाचे खालीलप्रमाणे प्रस्ताव प्रलंबित आहेत.

| अ.क्र. | वर्ष | प्रलंबित अर्ज (संख्या) | लागणारा निधी (रुपये लाखात) |
|---|---|---|---|
| १ | २०१३-१४ | ४८९ | २१४.०० |
| २ | २०१४-१५ | २९७५ | ८९२.०० |
| | **एकूण** | **३४६४** | **११०६.००** |

निधी उपलब्धतेनुसार अनुदानाचे वाटप करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मौजे बेलोरा (ता.दिग्रस, जि.यवतमाळ) गावाचे पुनर्वसन करण्याबाबत**

**(४९) * २५०९४ श्री.ख्वाजा बेग, श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे बेलोरा (ता.दिग्रस, जि.यवतमाळ) या गावात पुराचे पाणी शिरत असल्याने सदर गावाचे पुनर्वसन करण्याचा निर्णय शासनाने सन २०१३ मध्ये घेवून कोणतीच कार्यवाही केली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार पुरामुळे सदर गावातील नागरीकांची जिवीत व वित्त हानी होवू नये म्हणून गावांचे पुनर्वसन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२) व (३) अंशत: खरे आहे.

मौजा बेलोरा येथील गावकऱ्यांनी अरूणावती प्रकल्पातील संपादित जमिनी मोजा सावंगा (बु) येथील स.नं.३५ व ३६ यामध्ये पुनर्वसन करण्यात यावे अशी मागणी केली आहे. परंतु सदर जमीन धरणाच्या पायथ्याशी असून शासन निर्णयानुसार धरण सुरक्षिततेच्या दृष्टीने धरणाच्या भिंतीच्या TOE पासून २०० मी. पर्यंत सिमांकन केल्यानंतर अंदाजे २ हेक्टर जमीन शिल्लक राहते व कडेने नाला असल्याने सदर जमीन गावठाण पुनर्वसनाच्या दृष्टीने योग्य होणार नाही. असा अहवाल उपविभागीय अभियंता, अरूणावती प्रकल्प विभाग, दिग्रस यांनी दिला आहे. त्यामुळे मौजा धानोरा (खु) येथील शेत स.नं.४६, ४७, ५५ व ५६ मधील क्षेत्र ३४.७४ हे.आर. जमीन अतिरिक्त विनावापर आहे. याबाबत मौ.बेलोरा येथील ग्रामसभेचा ठराव/संमती अद्याप प्राप्त नाही. सदर ग्रामसभेचा ठराव/संमती असल्यास व संबंधित विभागांचे ना-हरकत प्रमाणपत्र मिळाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

## अलिबाग, मुरूड व रोहा (जि.रायगड) या तालुक्यातील पूल व साकव यांची झालेली दुरवस्था

**(५०) * २३६३९ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अलिबाग, मुरूड व रोहा (जि.रायगड) या तालुक्यातील अनेक लहान मोठे पूल व साकव हे माहे जुलै, २०१६ ते सप्टेंबर, २०१६ मध्ये पडलेल्या अतिवृष्टीमुळे नादुरूस्त होऊन खचले गेले असून सदर पूल व साकव पडल्यास अनेक गावांचे संपर्क तुटून जिवीत व वित्तहानी झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार सदर तालुक्यातील पुलांचे व साकवांचे संबंधित विभागाकडून स्ट्रक्चरल ऑडिट करून सदर पूल व साकव यांची दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) नाही.

रोहा, जि.रायगड येथील अलिबाग-रोहा रस्ता रा.मा.९१ वरील कि.मी.४१/४१० मधील लहान पूल अतिशय क्षतिग्रस्त झाला होता. या पूलाच्या ठिकाणी नवीन पूल बांधण्याच्या कामाच्या निविदा बोलावण्यात आल्या आहेत.

(२) व (३) उपप्रश्न क्र. १ मधील बाबी संदर्भात क्षेत्रीय अधिकाऱ्यांमार्फत चौकशी केली असून सदर दुर्घटना अतिवृष्टीमुळे झाल्याचे निष्पन्न झाले आहे.

अलिबाग, मुरुड, रोहा तालुक्यातील काही पूलांचे स्टक्चरल ऑडीट करण्याची कार्यवाही प्रगतीत आहे. या ऑडीटचा अहवाल प्राप्त झाल्यावर त्यातील निष्कर्षाप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

## मोहोळ-वैराग (जि.सोलापूर) या राज्य मार्गाची झालेली दुरवस्था

**(५१) * २३९२० श्री.प्रशांत परिचारक :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोहोळ-वैराग (जि.सोलापूर) या राज्य मार्गावर मोठे खड्डे पडून व खचून सदर रस्ता धोकादायक बनला असून त्यावर वाहने चालविणे कठीण झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर राज्य मार्गावरील रस्त्यांची दुरूस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

प्रश्नांकित रस्ता रा.मा.१४१ चा भाग असून लांबी ३६.६० कि.मी. आहे. रस्त्यांच्या काही भागात सुमारे ५० मी. लांबीत भराव अतिवृष्टीने क्षतिग्रस्त झाला होता. तसेच काही लांबीत डांबरी पृष्ठभागावर खड्डे पडले आहेत. माती भराव पुर्नस्थापित करण्यात आला आहे. डांबरी-पृष्ठभागावरील खड्डे भरण्याचे काम प्रगतीत आहे. सद्यस्थितीत रस्त्यावरून वाहतूक सुरळीत सुरू आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**टोल करार तपासण्यासाठी नेमण्यात आलेल्या उच्चस्तरीय समितीच्या अहवालाबाबत**

**(५२) * २३४७९ श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.नरेंद्र पाटील, श्री.जयवंतराव जाधव, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले : तारांकित प्रश्न क्रमांक ४१५६ ला दिनांक २० मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर, खारघर व अन्य ठिकाणी टोलविरोधात आंदोलन सुरु झाल्यावर टोल करार तपासण्यासाठी नेमण्यात आलेल्या उच्चस्तरीय समितीच्या अहवालाबाबत कोणतीच कार्यवाही झाली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खाजगीकरणाबाबत आलेल्या प्रकल्पांच्या व पथकर स्थानकांच्या अडचणीबाबत अभ्यास गट समिती स्थापन करण्यात आली आहे व समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर योग्य ती कार्यवाही करण्यात आली आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

अ) कोल्हापूर येथील टोलविषयाबाबत मुख्य अभियंता व सहसचिव यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली होती. या समितीच्या शिफारशीनुसार दिनांक ०१/०१/२०१६ पासून कोल्हापूर एकात्मिक रस्ते विकास प्रकल्पावरील पथकर नाके बंद करण्यात आले आहेत.

ब) खारघर येथील टोलविषयाबाबत मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीच्या शिफारशीनुसार कळंबोली, पनवेल, कामोठे, कोपरा व खारघर या गावातील रहिवाशांच्या कार/जीप व तळोजा एम.आय.डी.सी. कडून येणा-या सर्व प्रकारच्या वाहनांना तसेच एस.टी. बसेसना दिनांक ०६/०१/२०१५ पासून पथकरातून सूट देण्यात आलेली आहे.

क) अन्य ठिकाणी तसेच जसे मुंबई प्रवेशद्वार व मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग या पथकर नाक्यांबद्दल अपर मुख्य सचिव (सा.बां.) यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली होती. सदर समितीने आपला अहवाल दिनांक २७/०४/२०१६ रोजी शासनास सादर केला असून सदर अहवाल शासनाच्या विचाराधीन आहे.

(२) होय.

मुख्य अभियंता, सा.बां. प्रादेशिक विभाग, मुंबई यांच्या अध्यक्षतेखालील समितीने मार्च, २०१५ मध्ये अहवाल सादर केला असून त्याअनुषंगाने १ जून, २०१५ पासून १२ टोलनाक्यांवर पथकर वसूली बंद करण्यात आली आहे. तसेच एकूण ५३ टोलनाक्यांवर कार, जीप व हलक्या वाहनांना व एस.टी. बसेसना आणि दिनांक २० जून, २०१५ पासून स्कुल बसेसना पथकरातून सुट देण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :** **उत्तमसिंग चव्हाण**

**नागपूर.** **सचिव,**

**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात येत आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.